# मंगलाताई भागवत फाऊंडेशन

**वेळ : ३ तास** **विषय : मराठी (LL)** **गुण : ८०**

**सूचना :**

१. सूचनांनुसार आकलन कृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

२. आकृत्या पेनानेच काढाव्यात.

३. उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतींची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

४. विभाग–५ उपयोजित लेखन प्र.५(अ)(२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१(इ) अपरित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

५. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ : गद्य

**पठित गद्य – प्रश्न १अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **(२)**

(१) चौकटी पूर्ण करा.

(२) हा पदार्थ पाहून पंताच्या अंगाचा – ☐

(३) पंतांना अमृतासारखा वाटणारा रस – ☐

(४) धारोष्ण दुधासाठी पंत येथे जात – ☐

(५) पंत या रस्त्याने धावत – ☐

साखर पाहिली, की माझ्या अंगाचा तिळपापड होऊ लागला. केवळ फळांवर मी जगू लागलो. लिंबाचा रस तर मला अमृतासारखा वाटू लागला. धारोष्ण दुधासाठी मी अधूनमधून अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागलो. दोरीवरच्या उड्या केवळ खालच्या मजल्यावरील मंडळीच्या 'दुष्टपणाने व आकसाने' केलेल्या तक्रारींमुळे थांबवाव्या लागल्या. दहा उड्या पाय न अडकता मारण्यापर्यंत मी पोचलो. कचेरी सुटली, की मी गिरगाव रस्त्याने धावत येऊ लागलो. केवळ पौष्टिक आणि सात्विक आहार सुरु केला. जवळजवळ दहाबारा दिवस हा क्रम चालू होता. माझ्यातला फरक मलाच कळत होता. लहान मुले बी पेरले की रोप किती वाढले हे रोप उपटून पाहतात त्याप्रमाणे रोज संध्याकाळी काट्यावर वजन करावे असे वाटत होते मला ; पण मी ती इच्छा दाबून धरली. बरोबर एक महिन्याने मी वजन करणार होतो. एक महिनाभर तुपाचा थेंब माझ्या पोटात जाणार नव्हता. केवळ दूध ! दुर्दैवाने रोज गाईचे धारोष्ण दूध मिळण्याची सोय नव्हती; पण एकूण आहारव्रत जोरात चालू ठेवले.

पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला. एकदा सोकाजीने चोरुन कोळंबीभात चारला व खालच्या मजल्यावरच्या भाऊजी पसरटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठवला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला.

१) **आकृती पूर्ण करा.** **(१)**

पंतांना शेजाऱ्यांनी दिलेले भाताचे पदार्थ

सोकाजीने → ( )

पसरटवारांनी → ( )

२) **कारण लिहा.** **(१)**

पंतांना दोरी वरच्या उड्या थांबवाव्या लागल्या, कारण .........

३) माणसाच्या रोजच्या जीवनातही विनोद हवाच, हे विधान स्पष्ट करा. **(३)**

**आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्या एवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो ! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीस खात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करीत होते. तेव्हा सहाजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करुन उन्हातान्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पस मधील कॅनॉलमध्ये चोरुन पोहणे ; कैऱ्या, पेरु पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करुन क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्या बद्दल बऱ्याच तक्रारी आईच्या कानावर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मक लाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोपऱ्यात जाऊन रडत बसायचो ! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

१) **आकृती पूर्ण करा –** **(२)**

**लेखकाच्या बालपणीचा दिनक्रम**

↓ [ ]

↓ [ ]

↓ [ ]

↓ [ ]

२) **विधाने पूर्ण करा.** **(२)**

i) तिथेच झोप लागायची आणि .........................

ii) घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच ..................

३) **'शिस्तीने राष्ट्र महान बनते' याच्याशी तुम्ही सहमत आहात का ? तुमचे मत सविस्तर लिहा.** **(३)**

**अपठित गद्य**

**प्र.१इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. येथे संतांची वाणी अमाप पिकते. ही संतांची परंपरा गेली सात शतके अखंडित चालू आहे. लोकसेवेचे महान मंदिर संतांनी या महाराष्ट्रात उभारले. त्याचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला. संत नामदेवांनी त्याच्या भिंती बांधल्या. संत एकनाथांनी त्यावर घुमट बांधला, तर संत तुकोबांनी त्यावर कळस चढवला. संत गाडगेबाबांनी त्या कळसावर पताका चढवली. संत ज्ञानोबापासून संत गाडगेबाबापर्यंत सर्व संतांचे सांगणे एक–देव देवळात नाही, दगडात नाही, तर तो माणसात आहे. दुर्दैवाची गोष्ट ही की, संतांनी सात शतके आकाशपाताळ एक केले. तरी माणसातला परमेश्वर अजून लोकांना दिसत नाही. त्यांना दगडातला परमेश्वर दिसतो. संत गाडगेबाबांनी लक्षावधी लोकांना सतत ओरडून सांगितले, 'बाबांनो दगडधोंड्यांची पूजा करु नका रे, माणसाची पूजा करा.' संत गाडगेबाबांनी जीवनभर भिकाऱ्यांची, पांगळ्यांची, रोग्यांची आणि जनावरांची पूजा केली. 'गरिबांचा उद्धार' हा एकचच त्यांच्या कीर्तनाचा विषय असे.

१) **आकृती पूर्ण करा.** **(२)**

गाडगेबाबांनी यांची पूजा केली



२) **आकृती पूर्ण करा.** **(२)**

लोकसेवेच्या मंदिरासाठी कार्ये



## विभाग – २ पद्य

**प्रश्न २.अ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **(१)**

**१) एका शब्दात उत्तरे लिहा.**


१) कवीचा जवळचा मित्र –

२) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट –

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला ; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले.
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

**२) आकृती पूर्ण करा.** **(१)**

कवीचे प्रत्येकी दोन दिवस यात गेले



**२) कृती पूर्ण करा.** **(२)**

i) ‘‘रोजची भूक भागवण्यासाठी कवीला कराव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आयुष्याचे दिवस वाया गेलेत’’ या अर्थाची ओळ कवितेत शोधून लिहा.

ii) कवीचा आशावाद व कष्ट दाखवणारी ओळ शोधून लिहा.

**३) कवितेतील पुढील शब्दांचे अर्थ लिहा.** **(२)**

i) चंद्र – ii) साहाय्य – iii) आयुष्य – iv) शाळा –

**४) कवितेच्या आधारे कष्टकारी/मजूर याचे जीवन तुम्हाला कसे वाटते, ते तुमच्या शब्दात लिहा.** **(२)**

**आ) पुढील पैकी कोणत्याही एका कवितेवर त्याखाली दिलेल्या मुद्दांच्या आधारे कृती सोडवा. (८)**

| **क्र.** | **मुद्दे** | **औक्षण किंवा हिरवंगार झाडासारखं** | | |
|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री | | | **(१)** |
| २. | प्रस्तुत कवितेचा विषय – | | | **(१)** |
| ३. | प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा – | जीव ओवाळावा तरी<br>जीव किती हा लहान:<br>तुझ्या शौर्यगाथे पुढे<br>त्याची केवढीशी शान: | झाडांच्या पानावरुन<br>वहीच्या पानावर<br>अलगद उतरतात<br>दवांचे टपोरे थेंब | **(२)** |
| ४. | प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – | | | **(२)** |
| ५. | प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा – | (i) आसवे | (ii) व्रत | **(२)** |
| | | (ii) असंख्य | (ii) पक्षी | |
| | | (iii) औक्षण | (iii) पान | |
| | | (iv) दुबळे | (iv) शरीर | |

**विभाग – ३ स्थूलवाचन**

**प्रश्न ३. पुढीलपैकी कोणत्याही २ कृती सोडवा. (६)**

१) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस ! या विधानाची यथार्थता स्पष्ट करा.

२) तुम्हाला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

३) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते, 'हे मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाच्या आधारे लिहा.

**विभाग – ४ भाषाभ्यास**

**प्रश्न ४.अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती:**

१) वाक्यप्रकार –पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा.

i) शाब्बास ! किती छान बोललास तू !

ii) पाऊस पडला नाही तर सर्वत्र हाहाकार माजेल.

२) वाक्य रुपांतर –कंसातील सूचनांनुसार वाक्य रुपांतर करा **(२)**

i) पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा)

ii) शालिनी खूप सुंदर नृत्य करते. (उद्गारार्थी करा)

**३) वाक्प्रचार:**

**पुढीलपैकी कोणत्याही २ वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i) आ वासून पाहणे

ii) अंगाचा तिळपापड होणे

iii) चेहरा पडणे

**आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**शब्दसंपत्ती :**

**१) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१)**

i) अपेक्षित x ii) कमाल x

**२) शब्द समुहाबद्दल एक शब्द लिहा.** **(१)**

**केलेले उपकार न जाणणारा**

**३) वचन बदला** **(१)**

i) रात्री = ☐ ii) केस = ☐

**४) लिंग ओळखा** **(१)**

i) स्वर - ☐ ii) कल्पना - ☐

**२) लेखन नियमांनुसार लेखन.**

**अ) पुढील वाक्ये लेखन नियमांनुसार अचूक लिहा.** **(२)**

i) खरेदीला जातना कापडी पीशवी जवळ असावि.

ii) तीने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले.

**३) विरामचिन्हे** **(२)**

**पुढील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

i) काका तुम्ही कोठे राहता

ii) शाब्बास तु छान काम केलेस

## विभाग – ५ उपयोजित लेखन

**प्रश्न ५.अ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(६)**

i) पत्रलेखन : पुढील निवेदन वाचा व त्या खालील कृती सोडवा.

सरस्वती विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे आयोजित
आंतरशालेय एकपात्री अभिनय स्पर्धा (वर्ष १२वे)
अंतिम फेरी – २५ स्पर्धक
कोण होणार अभिनय सम्राट/सम्राज्ञी
दि. २५ डिसेंबर, वेळ सकाळी ठिक ११ वा.
स्थळ : शाळेचे श्रेयस सभागृह, तळ मजला

कुमार/केतकी साने विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

या स्पर्धेसाठी दिग्दर्शक श्री. विजय केंकरे यांना परिक्षक म्हणून विनंती करणारे पत्र लिहा.

**किंवा**

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवलेल्या अभिनय सम्राट/सम्राज्ञी ठरलेल्या सुधीर/सान्वी सुर्वे याला/हिला त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

**२) सारांशलेखन:**

विभाग १: गद्य (इ) प्रश्न क्र.१(इ)मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक–तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा. **(६)**

**प्रश्न ५.आ) पुढीलपैकी कोणत्याही २ कृती सोडवा.** **(५)**

**जाहिरात लेखन : (५० ते ६० शब्द)**

**पुढील शब्दांच्या आधारे जाहिरात तयार करा.**

कापडी पिशव्या, | विविध रंग/डिझाईन, | विविध आकारात ठिकाऊ

दैनंदिन वापरासाठी | भेटवस्तूसाठी | विविध वापरांसाठी ठिकाण

उपलब्धता — संपर्क

**२) बातमी लेखन: (५० ते ६० शब्द)** **(५)**

- **पुढील निवेदन वाचा व शाळेतील स्वातंत्रदिन समारंभाचा वृत्तांत लिहा.**

| |
|---|
| सर्वांना हार्दिक निमंत्रण<br>भारताच्या स्वातंत्र्य दिन सोहळा<br>प्रमुख पाहुणे – डॉ. तात्याराव लहाने (नेत्ररोग तज्ञ)<br>वेळ सकाळी ७ ते ९<br>स्थळ : श्री निकेतन विद्या मंदिर, कल्याण |


**३) कथा लेखन: (८० ते ९० शब्द)** **(५)**

- **पुढे दिलेल्या मुद्दांवरुन गोष्ट लिहा. योग्य शिर्षक देऊन तात्पर्य लिहा.**

**मुद्दे :** एक मुलगा ....... आईसह झोपडीत राहणे..... पावसाळ्याचे दिवस ..... मुसळधार पाऊस ...... रेल्वे रुळ उखडणे..... त्याला दिसणे....अंगातला लाल शर्ट काढून काठीला गुंडाळणे ..... गाडी समोर उभे राहून काठी उंच करुन दाखवणे...... ड्रायव्हरची नजर...... गाडी थांबवणे... प्रवाशांचे प्राण वाचणे..... राष्ट्रपतींकडून सत्कार... तात्पर्य.

**प्रश्न ५.इ) पुढील पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा. (१०० ते १२० शब्द)** **(८)**

**१) प्रसंग लेखन:**





**वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करुन या प्रसंगाचे लेखन करा.**

**२) आत्मकथन :**



वरील घटक तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करा आणि त्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.

३) वैचारिक लेखन :-




***********